जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2018
सकाळ

# अवांतर वाचनाने विद्यार्थी समृद्ध : शिर्के

कोल्हापूर, ता. १८ : 'पुस्तकाबरोबर अवांतर वाचन विद्यार्थ्याला समृद्ध करते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांत भाग घेऊन व्यक्तिमत्त्व विकसित करावे. जीवनात आदर्शवत व्यक्तींच्या विचाराचा आणि आचाराचा वारसा जपावा." अध्यक्ष डॉ. मोरे म्हणाले, "महाविद्यालयात आलेला सर्वसाधारण गुणवत्ता प्राप्त केलेला विद्यार्थी सर्वोत्तम होऊन बाहेर पडावा, यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्न केले पाहिजेत."

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना किटचेही वाटप केले. प्रा. राजेंद्र देठे, प्रा. पी. एच. कांबळे यांना बेस्ट टीचर ॲवॉर्ड देण्यात आले. बी. एम. शिंदे व डी. डी. पाटील यांना बेस्ट कार्यालयीन सेवक ॲवॉर्डने गौरविण्यात आले. या वेळी संस्थेच्या संचालिका सरोज पाटील, एम. बी. शेख, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, माधव मोहिते, व्यंकाप्पा भोसले, विक्रांत पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी रुबिना मुल्ला आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. सी. तुळशीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य प्रा. राजेंद्र देठे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 FEB 2018
सकाळ

# विद्यार्थी कल्याण मंडळ निवडणूक २७ ला

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदासाठी दोन, तर सचिवपदासाठी चार उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. ही निवडणूक २७ फेब्रुवारीला होणार आहे. विद्यापीठ संलग्नित २८२ महाविद्यालयांतून मेरिटनुसार १५ जणांची निवड झाली. त्यातील विद्यार्थ्यांनी अध्यक्ष व सचिवपदासाठी अर्ज दाखल केले होते. त्याची छाननी प्रक्रिया काल (ता. १७) पार पडली. अध्यक्षपदासाठी कमला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किशोरी पसारे आणि न्यू कॉलेजच्या अभिषेक श्रीराम यांचे अर्ज पात्र ठरले. तसेच सचिवपदासाठी नम्रता काटवटे (उंब्रज), साताऱ्यातील अमित भिसे व विशाल मंद्रे आणि सांगलीतील शुभांगी नलवडे यांचे अर्ज पात्र ठरले. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची तारीख २० फेब्रुवारी असल्याचे डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2018
पुढारी

# विद्यापीठाच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत अमित पाटील द्वितीय



**कुंभोज (वार्ताहर) :** वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या लीड कॉलेजअंतर्गत शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये कुंभोजच्या अमित अनिल पाटील याने द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता. अमितला अनिल पाटील, सूरज खोत, सूरज घाटगे, श्रीशैल्य परीट आदींचे मार्गदर्शन लाभले.

19 FEB 2018
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**संशोधक, अभ्यासकांना ठरणार उपयुक्त : सह्याद्री इतिहास संशोधन केंद्राचा उपक्रम**


# तीनशे विद्यापीठांमध्ये पोहोचले 'शिवाजी द ग्रेट'

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राजाराम महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी द ग्रेट' या शिवचरित्राचा पुनर्जन्म कोल्हापुरात गेल्या दोन वर्षांपूर्वी झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास मांडणाऱ्या आणि पुनर्संपादन झालेल्या पाच खंडांचा हा ग्रंथ आतापर्यंत देशभरातील तीनशे विद्यापीठांत पोहोचला आहे.

या पुनर्संपादनातून नव्याने १८०० पानांचा पाच खंडांचा 'शिवाजी द ग्रेट' हा ग्रंथ तयार झाला. या ग्रंथाचे संपादन सह्याद्री इतिहास संशोधन केंद्राचे अध्यक्ष व इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी केले. योग्य संदर्भसाधनांच्या आणि इंग्रजी भाषेतील प्रभावी शिवचरित्राअभावी देश-विदेशांतील विद्वानांनी लिहिलेल्या इतिहासामध्ये शिवचरित्राची योग्य मांडणी झालेली नाही. त्यामुळे आजही इतिहास संशोधकांना शिवचरित्राची उणीव भासते. ती भरुन काढत डॉ. बाळकृष्ण लिखित हे शिवचरित्र देश-विदेशांतील विद्यापीठांमधील विद्यार्थी, अभ्यासक संशोधकांना उपलब्ध व्हावे यासाठी सह्याद्री इतिहास संशोधन केंद्रातर्फे जगभरातील विद्यापीठांना भेट म्हणून मोफत पाठविण्यात येत आहे. त्याची सुरुवात १३ ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आली. यानंतर आतापर्यंत भारतातील तीनशे विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांमध्ये हा ग्रंथ पोहोचला आहे. यामध्ये अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, जेएनयु, बनारस हिंदू विश्वविद्यालय, बनस्थली विद्यापीठासह आसाम, कोलकाता, बिहार, आदी राज्यांतील विद्यापीठे, आयआयटी, आयआयएम या शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. या विद्यापीठांना दिलेल्या ग्रंथांत संपादकीय खंड, 'शहाजी,' 'शिवाजी द ग्रेट' भाग एक व दोन, 'शिवाजी द मॅन अँड हिज वर्क' या खंडांचा समावेश आहे. देशभरातील इतिहास संशोधक, अभ्यासकांना हा ग्रंथ उपयुक्त ठरणार आहे.

## सह्याद्री इतिहास संशोधन केंद्राकडून पुनर्संपादन




मुल्तान, पंजाबसारख्या प्रदेशांतून आलेले व लंडन विद्यापीठातून पीएच. डी. केलेले डॉ. बाळकृष्ण हे राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्यांनी सन १९३२ ते १९४० च्या दरम्यान शककर्ते शिवरायांचे चरित्र 'शिवाजी द ग्रेट' या नावाने चार खंडांत प्रसिद्ध केले होते; पण, दुर्दैवाने काळाच्या ओघात हे महान शिवचरित्र विस्मरणात गेले होते. ते पुन्हा एकदा लोकांसमोर आणण्याचे काम गतवर्षी या खंडांच्या पुनर्संपादनाद्वारे केले असल्याचे सह्याद्री इतिहास संशोधन केंद्राचे अध्यक्ष इंद्रजित सावंत यांनी सांगितले.

"

देशभरातील संशोधक, इतिहास अभ्यासक यांच्यापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास, चरित्र पोहोचावे, या उद्देशाने 'शिवाजी द ग्रेट' हा ग्रंथ विविध पाचशे विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना पाठविण्यात येत आहे. ज्या विद्यापीठांना हा ग्रंथ मिळाला आहे, त्यांच्याकडून समाधान आणि आभार व्यक्त होत आहे. देशातील विद्यापीठे पूर्ण झाल्यानंतर जगभरातील विविध विद्यापीठांपर्यंत हा ग्रंथ पोहोचविणार आहे.

**- इंद्रजित सावंत,**
**इतिहास संशोधक**

19 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांगलीत मोडी लिपीत 'शिवस्मरण'

## मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा उपक्रम




म. टा. वृत्तसेवा, सांगली

सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी शिवजयंतीनिमित मोडी लिपीत संपूर्ण शिवचरित्र लिहिले आहे. भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून हा अभिनव उपक्रम करण्यात आला असून, मोडी लिपीत भित्तीपत्रिका साकारणारे गरवारे महाविद्यालय राज्यात पहिले ठरल्याचा दावा मोडी लिपीचे प्रशिक्षक मानसिंग कुमठेकर यांनी केला आहे.

सर्वसाधारणपणे महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्षी कोणत्या ना कोणत्या विषयांची भित्तीपत्रिका केली जाते. सांगलीतील गरवारे महाविद्यालयात मात्र इतिहास विभागाच्या वतीने मोडी लिपीतील भित्तीपत्रिका करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवनपट भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून उलगडून दाखविण्यात आला आहे. प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागाच्या प्रा. ऊर्मिला क्षीरसागर यांनी या उपक्रमाचे संयोजन केले. विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंची माहिती सांगणारे लेख मोडी लिपीतून लिहिले. शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण, आरमार, विविध किल्ले, त्यांचे धार्मिक धोरण, अशा विविध विषयांवर मोडी लिपीत लेख लिहून ते आकर्षकरीत्या मांडण्यात आले.

या भित्तीपत्रिकेला 'शिवस्मरण' असे नावही देण्यात आले आहे. मोडी लिपी शिक्षक मानसिंगराव कुमठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगल राबडे, मृणालिनी फडके, सपंना निंबाळकर, प्राजक्ता जाधव, स्वाती घोडके, स्मितल वाघमोडे, श्रद्धा सुतार, मधुरा कोळिगिरी, स्वप्नाली रजपूत, ऐश्वर्या पवार, काजल केळूसकर, निकिता वैद्य, जागृती तिरमारे, हर्षदा कांबळे, पूजा कोळी, जयश्री पाटील, गायत्री कुलकर्णी यांनी मोडी लिपीतील लेख लिहिले. भित्तीपत्रिकेच्या उद्घाटनावेळी विद्यार्थिनींनी रांगोळी रेखाटली तीही मोडी लिपीतील अक्षरांचीच.




"विद्यापीठ अनुदान आयोगाने सहा लाखांचे अनुदान देऊन मुलींसाठी एक वर्ष कालावधीचा देशातील पहिला कोर्स मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात सुरू केला आहे. कोर्सचे यंदाचे पाचवे वर्ष आहे. दरवर्षी ४०-५० मुली मोडी लिपी शिकतात. मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि इतिहास संशोधनाला चालना मिळावी, असा हेतू आहे. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

– मानसिंग कुमठेकर,
मोडी लिपीचे प्रशिक्षक, इतिहास संशोधक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2018
लोकमत

# छत्रपती शिवरायांवर संशोधनासाठी मिळणार 'फेलोशिप'

अजय पाटील ।
लोकमत न्यूज नेटवर्क



**जळगाव :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज अध्ययन व संशोधन केंद्राकडून संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना यंदापासून २४ महिन्यांची फेलोशिप दिली जाणार आहे.

माजी केंद्रीय राज्यमंत्री विजय नवल पाटील यांनी यासाठी विद्यापीठाला दोन लाख रुपयांचा धनादेश दिला असून, विद्यापीठातील पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना ही फेलोशिप मिळणार आहे. दरम्यान, किती विद्यार्थ्यांना ही फेलोशिप मिळेल हे अद्याप निश्चित नसून, व्यवस्थापन परिषदेच्या पहिल्या सभेत याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. विद्यापीठाने फेलोशिपसाठी निवड समितीची स्थापना केली असून निवड झालेल्या विद्यार्थ्याला दर महिन्याला ८ ते १० हजार रुपये दिले जाणार आहेत.